चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

६ मार्च, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक ०५/०३/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **बल्लारशाह, भद्रावती, माजरी, शेंगाव, ब्रम्हपुरी, नागभिड, सिंदेवाही, मुल, सावली, राजुरा, गोंडपिंपरी, कोठारी, गडचांदुर** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१५** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **०५** आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **२,२४,२००/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

### १)पोलीस स्टेशन सिंदेवाही :—

दिनांक **०५/०३/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **सिंदेवाही** अंतर्गत सरडपार येथे ०१ आरोपी ईसम हे सट्टापट्टीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **सिंदेवाही** येथे अप. क्र. **१३३/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **२२५/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **सिंदेवाही** पोलीस करीत आहे.

---

चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in



६ मार्च, २०१९



☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)


# वरोरा पोलीसांची अवैध दारूवर कार्यवाही

## ४ लक्ष ८० हजाराचा दारुचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक ६ मार्च, २०१९ रोजी वरोरा येथील पोलीस पथक पोस्टे परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, मौजा बोर्डा येथील नेताजी शाळेच्या मागच्या बाजुस काही इसम अवैध दारूचा साठा करून दारू विक्री करीत आहे. अशी माहिती मिळताच पोलीस स्टेशन पथकाने तात्काळ मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी पोहचुन छापा टाकला असता, त्याठिकाणाहुन एक संशयीत स्कॉर्पिओ वाहन भरधाव वेगाने जात असतांना दिसुन आले. पोलीस पथकाने तात्काळ शाळेच्या मागे जावुन पाहणी केली असता त्या ठिकाणी अवैध दारूचा साठा ज्यामध्ये ४८ पेटया देशी दारू किं. ४,८०,०००/—रू. असा माल मिळुन आला. सदरचा माल ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन वरोरा येथे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास वरोरा पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन वरोरा प्रभारी पोनि. श्री. उमेश पाटील यांचे सह वरोरा येथील पोलीस पथकाने पार पाडली.

---